# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक १३/०६/२०२२ (सोमवार)**

**(दुपार)**

---

### चोरी

**पो.स्टे. कन्हान** :– अंतर्गत ०५ कि. मी. अंतरावरील वराडा शिवार बंद टोलनाका येथे दिनांक ११/०६/२०२२ रोजी १८.०० वा. ते दिनांक १२/०६/२०२२ चे १०.०० वा. सुमारास फिर्यादी नामे– दिलीप श्यामरावजी बावने वय ४६ वर्ष, रा. स्वामी विवेकानंद नगर, कन्हान (सुपरवायझर) हे स्टॉपह पेट्रोलींग करीत असतांना वराडा शिवार बंद टोलनाका एन एच ४४ हायवे रोडवर लावलेले लोखंडी ४ रेलींग प्रत्येकी ३ मिटर लांबी अर्धा मिटर रुदी ची रेलींग दिसुन आले नाही लोखंडी ४ रेलींग प्रत्येकी किमत ४,८००/–रू. प्रमाणे एकुण १९,२००/–रू. चा मुद्देमाल अज्ञात आरोपीने चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार गणेश पाल मो. नं. ९५५२५१७२६८ हे करीत आहे.

### मोटरसायकल चोरी

**पो.स्टे. केळवद** :– अंतर्गत १२ कि. मी. अंतरावरील मौजा सावळी मोहतकर शिवार येथे दिनांक ०९/०६/२०२२ चे १०.०० वा. ते दिनांक १०/०६/२०२२ चे ०६.०० वा. सुमारास फिर्यादी नामे– लुकेश कोठीराम मोहतकर, वय ३४ वर्ष, रा. सावळी (मोहतकर) यांनी त्यांची एमएच–४०/टी– १२७७ क्रमांकाची निळ्या काळ्या रंगाची हिरो हॉन्डा स्प्लेन्डर प्लस मोटर सायकल घरासमोरील अंगणात ठेवलेली होती. त्यादरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादीची कि. २०,०००/–रु. ची मोटरसायकल रात्री दरम्यान चोरून नेली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. केळवद येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार सुभाष राठोड मो. नं. ९८२३१२४७४२ हे करीत आहे.

### जबरी संभोग

**पो.स्टे. बोरी** :– दिनांक ११/०६/२०२२ चे १३:०० वा. चे सुमारास वय १४ वर्षीय पीडित/फिर्यादी मुलगी ही एकटी घरी हजर असतांना आरोपी नामे– राजु रामदास उपासे वय ३५ वर्ष, रा. रूईखैरी याने घरात आत प्रवेश करून पीडितेला 'तुझ्या आई व वडीलांना मारून टाकेल' अशी धमकी देवुन पीडिता सोबत बळजबरीने शारीरिक संभोग केला. सदरची घटना 'तुझ्या आई व वडीलांना सांगीतले तर मारून टाकेल' अशी धमकी दिली. पीडित मुलगी हिने घडल्या प्रकारामुळे घाबरून गेली परंतु पीडित मुलीच्या आईने तिला विश्वासात घेवुन विचारपुस केली असता तिने घडलेला प्रकार सांगितले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. बोरी येथे आरोपीविरुध्द कलम ३७६(३), ४५२, ५०६ भादंवि. सहकलम ४ बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री पालीवाल मो.क्र. ९९२१३३७२८८ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**